भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२०६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०३/२०१७

**१) पानठेल्यातील चोरी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२/११/२०१७ चे ०१.१५ वा. दरम्यान मार्च यातील आरोपीने सुना मौका पाहुन फिर्यादीचे पानठेल्याचा ताला लोखंडी हातोडीने तोडुन पानठेल्यातील केनउड कंपनीचा बाजारू डेक,व फिर्यादीचे बाजुचं वासुदेव निंबेकर यांचे पानठेल्यातुन चार जिबी पेनड्रायु, सिगारेट पॉकेट १ नग, हातनपटटी सुपारी तीन किलो, जर्दा तबांखु डब्बे५ नग, मसाला पुडया १४० नग, १ स्टील व जर्मन डब्बा, ५ रू. च्या १० नोटा, चिल्लर ३५५/रू. असा एकुन३००७/रू. चा माल चोरून नेतांनी पोलीसांनी आरोपीला पकडले आहे व चोरीस गेलेला माल फिर्यादीचे बाजुला लागुन आलेल्या वासुदेव गोपीचंद निंबेकर याचे पानठेल्यातील असल्याचे खात्री झाल्याने फिर्यादी दिपक शंकर चौधरीवय २१ वर्ष रा. वार्ड न. ७ साकोली याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४६१,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) टिप्पर लापरवाहीने चालवुन मोटारसायकल चालकास धडक देवुन एकाच्या मृत्युस व एकाला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २२/०३/२०१७ चे १०.२० वा. दरम्यान. यातील फिर्यादी आशीष काशीनाथ पातोडे वय १९ वर्ष, रा. वडेगांव त. सडक अर्जुनी जिल्हा गोंदिया हे आपले हिरो होंन्डा स्पलेंडर मोटार सायकल क्र. एम.एच. ३५ झेंड ०९९१ ने साकोली कडुन लाखांदुर कडे डब्बलसीट जात असता यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील टिप्पर क्र. एम.एच. ३६/०४६४ हे लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला घडक देवुन फिर्यादीस जखमी करण्यास व मोटार सायकलचे मागे बसलेला मृतक सेवक परसराम वाढई वय ४० वर्ष, रा. परसोडी याचे डोक्यावरून टिप्परचा चाक जावुन जागीच मरण पावल्याने फिर्यादीचे तोंडी वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३७,३०४(अ), भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) .विस्वासघात करून चोरी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक सन २०११ डिसेंबर पासुन आज पर्यत यातील आरोपी हा कॉन्ट्रक्टर असुन राष्ट्रीय प्रकल्प ता. पवनी जि. भंडारा अंतर्गत गोसे बुज उपसा सिंचन योजनेच्या पंप गृहाचे बांधकाम स्थापत्य यांत्रीकी व विदयुत कामाचा करारनामा क. बि.१/ १/ का.अ./ गो.वा.डा. /२०१०—११ अंतर्गत काम हाती घेतले होते.त्याकरिता पंप गृहाचे झालेल्या स्थापत्य कामाचे रूपये ५३,९८,२५८/रू. पंप गृहाच्या साहीत्या करिता ९३,१०,०४८/रू. १)चोरीस गेलेला माल — नॉन रिटन वॉल १२०० एमएम हायमिटर ३ नग, कॉयनाटीक एअर वॉल २००एमएम डाय (फारस्टेज—१)२ नग, एफसीएमए स्पॉट स्टार्टर (फारस्टेज—१)३ नग, ३ एचडी इंडक्सन मोटार ६.६केव्ही २७०के.डब्लु ३ फेस ५००आरपीएम ५० एच. झेंड(फारस्टेज—१)२ नग, एफसीएमस्पॉट स्टार्टर (फारस्टेज—१)३ नग, नॉन रिटन वॉल ४०० एमएम डाय, मीटर (फारस्टेज—१)२ नग, कॉयनाटीक एअर वॉल ९०० एमएम डाय, (फारस्टेज—१)३ नग, एलटी डिस्ट्रीब्युशन पॅनल ४१५ वही थ्रीफेस २००० एमपी १ नग, सप्लाय अॅन्ड इस्टॉलेश ऑफ १ नग, रिमार्ट कन्ट्रोल पॅनल १ नग, अर्थंग १ नग असाएकुन ९३,१०,०४८/रू.च्या कामाचे १,०२,०५,६७५/रू.असा एकुन १,५६,०३,९३३/रू.चे देयके आरोपीस दि. १८/०३/२०१४ ला अदा करण्यात आले होते. या शिवाय भाव वाढीकरिता रूपये १०,८२,७४१/रू. चे अतीरीक्त भुगतान करण्यात आले असुन यातील आरोपीने करारनाम्या नुसार हाती घेतले व काम पुर्ण न करतो विस्वासघात केल्याने व बांधकामाचे साहीत्य चोरून नेल्याने फिर्यादी प्रदीप नारायन कापसे वय ३२ वर्ष रा. कार्यकारी अंभियंता गोसे खुर्द डावा कालवा विभाग वाही पवनी यांचे लेखी रिपोर्ट व मा. जेएमएफसी. कोर्ट पवनी यांचे आदेशाने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४०६,३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डोंगरे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**४) संगनमत करून कारण नसतांना शिवीगाळ व मारपीठ, धारदार वस्तुने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २१/०३/२०१७ चे २२.४५ते २३.०३वा. दरम्यान यातील फिर्यादी विलास उर्फ सर्कीट गजानन सिरसागर वय २६ वर्ष, रा. इंदीरा गाधी वार्ड कुंभारे टोली चांदनी चौक भंडारा हा मजुरीचे कामावरून घरी परत जात असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करून कोणतेही कारण नसतांना फिर्यादीलो शिवीगाळ केली असता फिर्यादीने त्यांना हटकले असता यातील आरोपीतांनी लाथाबुक्यांनी व कोणत्यातरी धारदार वस्तुने मानेवर, डावे हाताचे पंज्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) गळफास लावुन उपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिनांक २२/०३/२०१७ चे ०६.०० वा. दरम्यान यातील मृतक नेहरू कवडु मदनकर वय ३९ वर्ष, रा. सिरसी याचे नातेवाईक हे दि.२१/०३/२०१७ चे २१.४५ वा. नंतर गाढ झोपेत असतांना मृतकने गळयाला नॉयलान दोरीने गळफास लावुन घेतल्याने त्यास उपचारा करिता सा.रू. भंडारा येथे नेले असता तो मृत अवस्थेत असल्याने डॉक्टरी मेमो वरून पोस्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. बांडेबुचे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे वरठी येथे कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. हलमारे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहे.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २२/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ६९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०५, तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**७) अवैध दारु/ जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २२/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. पालांदुर,येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ०२ लिटर ३४० मिली देशी किंमती ६५०/–रु. तसेच जुगारातुन १३१०/–रु. असा एकुण किंमती १,९६०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोउपनि.ए.व्ही. तुळजेवार
**नियंत्रण कक्ष अधिकारी भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ७७६८८६९९७७**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.